# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 21/12/2015 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

सोमवार दिनांक 21 डिसेंबर 2015 (का.प.क्र .11) रोजी मा.सभापती श्री.थोरात दिलीप गंगाधर यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.00 वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
02. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
03. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
04. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
05. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
06. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
07. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
08. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
09. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
10. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
11. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
12. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

**<u>चर्चा :</u>**

श्रीमती कमल नरोटे :सभेमध्ये प्रत्येक वेळेस माझ्या वॉर्डातील रस्त्याच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यात येते. मागील 4 तारखेच्या बैठकीमध्ये 15 दिवसात रस्त्याचे काम करण्यासंदर्भात आश्वासन दिले होते. परंतु कोणतीच कारवाई करण्यात येत नाही. आजची स्थायी समितची सभा चालू देणार नाही. वॉर्डात नागरीकांना तोंड दाखविण्यास आम्हाला लाज वाटू लागली आहे. प्रत्येक वेळेस 15-20 दिवसात काम करण्यात येईल म्हणुन सांगण्यात येते. दिवाळी, दसरा झाले परंतु रस्त्याचे काम झालेले नाही. आजची सभा मी चालू देणार नाही. प्रशासनाचा कुठलाच खुलासा मला ऐकण्याची इच्छा नाही. आम्ही जनतेपुढे कोणत्या तोंडाने जायचे?

श्री.नितीन चित्ते :मागच्या दिडवर्षापासून स.सदस्या कामाची मागणी करीत आहे. शहराला बऱ्याच अवधीनंतर एक सक्षम व चांगले आयुक्त लाभलेले आहे. सन 1982 ला मनपाची स्थापना झाली. त्यानंतर शहराला अपेक्षीत असे आयुक्त श्री.सुनिल केंद्रेकर लाभलेले आहेत. 113 नगरसेवकांना रोडचा त्रास होत आहे. मा.आयुक्त महोदय यांनी पहाणी करून काम करण्यात सुरूवात केलेली आहे. शहरातील आमच्या स.सदस्यांच्या पाणी,ड्रेनेज,रस्ते ह्या समस्या/अपेक्षा पुर्ण झाल्या पाहिजे.

श्रीमती कमल नरोटे :मी नवीन कामाची मागणी केलेली नाही. रस्त्याचे जुनेच काम आहे. रस्त्याची समस्या सुटली पाहिजे.

श्री.नितीन चित्ते :5 रस्त्याची कामे हाती घेतल्याबाबत प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येते.रस्ते, वीज, पाणी, ड्रेनेज ह्या समस्या सुटल्या पाहिजे 113 नगरसेवकांची वॉर्डातील कामे झाली पाहिजे मा.आयुक्त यांचे बरोबर बसून या संबंधी चर्चा करण्यात यावी. स.सदस्या श्रीमती नरोटे यांचे वॉर्डातील कामे करण्यात यावी.

श्रीमती कमल नरोटे :प्रत्येक वेळेस प्रशासनाने खुलासा केलेला आहे. आमच्या भावना मा.आयुक्त महोदय यांचेपर्यंत का पोहचत नाही? दिनांक 04.12.2015 रोजीच्या सभेत रस्त्याचे काम करणे संदर्भात आश्वासन दिले होते. 15 दिवस झालेले आहे काम झालेले नाही.

मा.सभापती :शहर अभियंता या संबंधी खुलासा करतील.

श्रीमती कमल नरोटे :मला खुलासा नको आहे. रस्त्याचे काम झालेले पाहिजे. प्रत्येक वेळेस फक्त खुलासा करण्यात येतो. कारवाई करण्यात येत नाही.
(स.सदस्या याच वेळी सभागृह सोडून जातात.) वेळ दु.12.15 वाजता.

शहर अभियंता :Partly pymt करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. मा.आयुक्त महोदय यांचेशी या संबंधी चर्चा करण्यात आली आहे. व्हाईट टॉपींग रस्त्याचे मुंबई येथील कंत्राटदार यांचेशी मा.आयुक्त यांनी चर्चा केलेली आहे. पार्टली पेमेंट करून सदर काम करणे बाबत निर्णय झालेला आहे. स.सदस्या यांचे वॉर्डातील रस्त्याबाबतचा प्रश्न सोडविण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येत आहे. व्हाईट टॉपींगचे अर्धवट अवस्थेतील रस्ते पुर्ण करण्यात येईल.निधी अभावी कामे थांबलेले आहेत. मा.आयुक्त महोदय यांनी आढावा घेतलेला आहे. प्रश्न लवकरच मार्गी लागेल.

मा.सभापती :मा.आयुक्त महोदय यांचेशी याबाबत चर्चा झालेली आहे. मनपाची आर्थिक परिस्थिती बघता विकासाचे कामे होत नाही. इतर कामांचे पेमेंट स्टॉप करण्यासंदर्भात सुचना केलेल्या आहेत. शहरातील रस्त्याचे प्रलंबीत कामे मार्गी लावण्यासाठी पदाधिकारी आणि मा.आयुक्त मिळून चर्चा करण्यात येईल. कामे मार्गी लावण्यात येईल. वार्डातील अंतर्गत विकासाचे कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.आर्थिक स्थिती विचारात घेता वसुलीवर नियंत्रण करुन उत्पन्न वाढवून हे कामे मार्गी लावण्यात येईल. शहरातील नागरीकांना यासंबंधी माहिती देण्यात यावी. रखडलेली कामे पुर्ण करण्यासाठी निधीची तरतुद केली जात आहे.

श्री.मकरंद कुलकर्णी :बळीराम पाटील ते बजरंग चौक रस्ता येथील एका साईडचे काम 8 महिन्यापुर्वी करण्यात आलेले आहे. परंतु रस्त्यावर आत प्रचंड खड्डे पडलेले आहे. नागरीकांना, वाहनचालकांना प्रचंड त्रास सोसावा लागत आहे.

मा.सभापती :ही परिस्थिती बरोबर आहे का? खुलासा करावा.

श्री.खन्ना एस.पी. :सदरील रस्त्याचे काम हे अद्यापपर्यंत पुर्ण झालेले नाही. व्हाईट टॉपींगचे काम केलेले आहे. पावसाळ्यामुळे काम थांबवले होते. पुर्ण लेयर टाकण्यात आलेले नाही. काम अर्धवट अवस्थेत आहे.

मा.सभापती :पुर्ण लेयर टाकण्यात आलेले नाही. रस्ता अर्धवट अवस्थेत आहे. सदरील रस्ता पुर्ण करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

श्री. विकास एडके :मा.आयुक्त महोदय यांनी फुटकळ कामे बंद करण्याबाबत घेतलेला निर्णय चांगला आहे. परंतु खरोखर तातडीचे कामे उद्‌भवल्यास अडचण निर्माण होत आहे. वॉर्डात ढापे टाकण्याचे काम सांगितल्यास कामे होत नाहीत.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :रेटलिस्ट ए-वन च्या कामावर नियंत्रण राहिलेले नव्हते. कामामध्ये अनागोंदी सुरू झाली होती. त्यामुळे ए-वन आणि रेटलिस्टचे कामे थांबविले आहे. ज्या ठिकाणी अत्यावश्यक कामे आहे त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून तेथील फोटो काढून त्याबाबतचा अहवाल मा.आयुक्त यांना सादर करावा. काम करण्यात येईल ज्या

ठिकाणी खरोखर गरज आहे तेथील कामांबाबत स्पष्ट अहवाल घेऊन कामाची निकड लक्षात घेता काम करण्यात येईल.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :स.सदस्यांनी सांगितल्यानंतर किती वेळात पाहणी होईल? हे सांगण्यात यावे. माझ्या वॉर्डातील समस्या बाबत व्हिडीओ शुटींग दाखवण्यात आले परंतु काम झाले नाही. मुरूम टाकण्यासंदर्भात छोटेसे कामेही झालेले नाही. अत्यावश्यक कामे होती. ढापे टाकण्याबाबत सांगण्यात आले होते परंतु कोणतीच कामे केलेले नाही.

शहर अभियंता :उपअभियंता/अभियंता यांना जागेवर प्रत्यक्ष पाहणी करण्यासंदर्भात पाठविण्यात येईल कामाची अत्यावश्यकता असल्यास कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मोहन मेघावाले :माझ्याही वॉर्डातील अत्यावश्यक कामे अद्यापपर्यंत केलेले नाही. प्रत्यक्षात काम होत नाही. प्रशासनाकडून बैठकीत फक्त खुलासा करण्यात येतो. प्रत्यक्षात काम होत नाहीत. माझ्या वॉर्डात पाण्याचा प्रश्न आहे. उद्घाटन होऊन 4 महिने झालेले आहे. आण्णाभाऊ साठे ते गोदावरी शाळेच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग रस्ता अर्धवट अवस्थेत आहे. सदर रस्त्याबाबत अनेक वेळा सभागृहात विषय मांडला. परंतु कारवाई शुन्य आहे. रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. स्थायी समितीने आदेश दिल्यानंतरही कामे होत नाही.

श्रीमती समिना शेख :मा.स्थायी समितीने रुलिंग दिल्यानंतरही कामे होत नाही.

मा.सभापती :आतापर्यंत हे होत होते आता सर्व गोष्टी निट होईल. परिस्थिती बदलण्यासाठी काही काळ देण्यात यावा. तसेच स.स.श्री.मेघावाले यांच्या तक्रारीसंबंधी प्रत्यक्ष अधिकारी यांनी भेटून प्रश्न सोडविण्यात यावा.

श्री.कोल्हे (कार्य.अभियंता):कामे करुन देण्यात यईल.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :श्री.कोल्हे यांचेकडे किती चार्ज आहे.

मा.सभापती :अधिकारी यांची कमी आहे.स.स.श्री.मेघावाले यांचे काम करण्यात यावे.

श्री.रेश्मा कुरेशी :माझ्या वॉर्डात आठ महिन्यांपासून कामे होत नाही.

श्री.नितीन चित्ते :सिडको हडको हा भाग पाणी सोडण्याबाबत सगळ्यात शेवटचा टप्पा आहे. प्रत्येक वेळेस फॉलोअप करण्यासाठी समांतरला कळवावे लागते. मागच्या दोन वर्षापसून एन-9 के पवननगर येथे ढापा टाकण्याबाबत सांगण्यात आलेले आहे. काम महत्वाचे आहे. परंतु अद्यापर्पयत काम करण्यात आलेले नाही. शहरात 362 विहीरी असतांना केवळ 12 विहीरींचा वापर केला जातो याकडे लक्ष देऊन नियोजन करण्यात यावे. पाणीपुरवठ्याच्या बाबतीत सिडको हडकोला सापत्न वागणुक दिली जाते. वॉटर युटिलीटी कंपनी वसुलीसाठी दादागीरी करीत आहे. विलंब झाल्यास 18 टक्के व्याज घेत आहे. ते कशाच्या आधारे? कंपनीच्या कराराचे काय व्हायचे ते होईल मात्र जनतेला पुरेसे पाणी मिळायला पाहिजे.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :कंपनी रात्री-बेरात्री Bill भरणा संदर्भात Message पाठवते यामुळे नागरीक त्रस्त आहेत.

श्री.मकरंद कुलकर्णी :महिन्याभरात पाणीपुरवठ्यामध्ये दोन खाडे पडलेले आहेत.

मा.सभापती :युटिलीटी कंपनीने शहरात नागरीकांकडुन 18% व्याज आकारणी आणि आरेरावी थांबविण्यात यावी.

कार्य.अभि.(श्री.कोल्हे) :18% व्याज हे Dealy Payment वर आहे By Laws वर आधारित ही वसुली केली जाते.

मा.सभापती :SMS वर नियंत्रण ठेवण्यात यावे. विहीरी बाबत खुलासा करावा.

| | |
|---|---|
| कार्य.अभि.(श्री.कोल्हे) | :याबाबत (विहीरी) संचिका पुटअप करण्यात येईल. |
| मा.सभापती | :कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.नाईकवाडी अ.रहीम | :30 वर्षापासुन ज्या भागत पाईपलाईन नाही. पाईपलाईन आहे तीथे नळ नाही, अशा नागरीकांना पाण्याचे बीले भरण्याबाबत नोटीस दिलेले आहे. |
| मा.सभापती | :खुलासा करावा. |
| शहर अभियंता | :ज्या ठिकाणी नळजोडणी नसतांनाही बीले येत असतील तीथे पाहणी करुन पंचनामे करण्यात येतील. |
| श्री.नितीन चित्ते | :दि.04.12.2015 रोजीच्या स्थायी समिती मधील मुद्दा क्र.02 वर खुलासा करावा. |
| कार्य.अभि.(श्री.कोल्हे) | :याबाबत उत्तर दिलेले आहे. |
| श्री.नितीन चित्ते | :मा.न्यायालयाने निर्देश दिलेले आहे की, व्याज आकारु नये. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| विधी सल्लागार | :मा.उच्च न्यायालयात व सदरील रिट याचीका सुनावणी अंती आहे. मा.न्यायालयाने व्याज आकारु नये म्हणून तोंडी सुचना केलेली आहे. लेखी कळविण्यात आलेले नाही. |
| श्री.नितीन चित्ते | :हा मा.न्यायालयाचा अपमान नाही का? |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| विधी सल्लागार | :कंपनीला आदेशीत केलेले आहे, अनुपालन कंपनीला करावे लागेल. |
| श्री.विकास एडके | :मुकूंदवाडी येथील एवन हॉटेलचे बांधकाम अनधिकृत आहे. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| स.सं.नगर रचना | :प्रत्यक्ष पाहणी करुन माहिती देण्यात येईल. दोन दिवसात माहिती देण्यात येईल. |
| श्रीमती शेख समिना | :वॉर्ड अभियंता यांना पत्र दिले होते. सन 2013-14 सन 2014-15 वॉर्ड-ड येथील माहितीची विचारणा केली होती. उत्तर मिळाले नाही. |
| उपअभियंता | :सदर विषय माझ्याशी संबंधीत नाही परंतु माहिती देण्याचा प्रयत्न करतो. |
| श्री. विकास एडके | :हिमायतबाग येथील सलमान हॉल बाबत पत्र दिले होते. तो अनधिकृत आहे. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| उपअभियंता नगर रचना | :अनधिकृत असल्याबाबत कळविण्यात आले आहे. |
| श्री.विकास एडके | :अनधिकृत असल्याबाबत खुलासा केलेला आहे. बांधकामावर कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.मोहन मेघावाले | :माझ्या वॉर्डातील हॉलचा हा प्रश्न आहे. प्रशासनाने याबाबत माहिती द्यावी. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| उपआयुक्त (अतिक्रमण) | :सदर हॉलबाबत नगर रचना विभागाने खुलासा केलेला आहे. अनधिकृत असल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल. |
| श्रीमती रेश्मा कुरेशी | :अनधिकृत बांधकाम आहे. प्रशासनाला याबाबतची सर्व माहिती असतांना कारवाई का करण्यात येत नाही? |
| मा.सभापती | :मा.सर्वसाधारण सभेने आदेश दिलेले आहे. त्यानुसार कारवाई करण्यात यावी. |
| स.सं.नगर रचना | :भगवान शिक्षण प्रसारक मंडळ यांची संचिका मंजुर केलेली नाही. शासनाकडे कळविण्यात आले आहे. |
| श्री. विकास एडके | :तीन ताळाची परवानगी घेतलेली आहे. बांधकाम सात ताळांचे केलेले आहे. तीन ताळांपैकी उर्वरित जास्तीच्या बांधकामावर कारवाई झाली पाहिजे. |
| मा.सभापती | :भोगवटा प्रमाणपत्राच्या वेळेस यानुसार कारवाई करण्यात येईल. सध्या इमारतीचा वापर होत नाही. पाहणी करुन अहवाल देण्यात यावा. |

श्री. विकास एडके :इमारतीचा वापर चालु आहे.

मा.सभापती :याबाबत प्रशासनाने माहिती घेवून कळविण्यात यावे.

श्रीमती रेश्मा कुरेशी :तीन मजले बांधकाम परवानगी घेवून 7 मजल्याचे काम केलेले आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

सहा.सं.न.रचना :भगवान शिक्षण प्रसारक मंडळ यांचे 20 हजार स्क्वेअर मी.चे बांधकाम आहे. त्या ठिकाणी त्यांचे कॉलेज/हॉस्पीटल व इतर शैक्षणिक उपक्रम आहेत. हॉस्पीटलची परवानगी आहे. तीन मजल्याला परवानगी आहे. सात मजली बांधलेली आहे. नियमितकरण अनाधिकृत बांधकामावर कारवाई बाबत शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. शासनाचे मार्गदर्शन आल्यावर त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

श्रीमती रेश्मा कुरेशी :शासनाकडुन पत्र आले आहे का?

सहा.संचालक.न.रचना :शासनाकडुन अद्यापपर्यंत पत्र आलेले नाही.

श्रीमती शेख समिना :चालु आर्थिक वर्षात 14 व्या वित्त आयोगातुन मनपाला किती निधी प्राप्त झालेला आहे.

मुख्यलेखाधिकारी :कोणताही निधी मिळालेला नाही.

शहर अभियंता : ड वर्ग मनपास 14 व्या वित्त आयोगाचा निधी प्राप्त आहे. क वर्ग मनपास 14 व्या वित्त आयोगाचा निधी मिळालेला नाही.

श्री.मनगटे गजानन :गजानन महाराज मंदिर ते पुंडलिकनगर येथे भुमिगत गटार चे काम झालेले आहे. नागरीकांनी हे काम बंद केले आहे. खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):गजानन महाराज मंदिर चौक ते जयभवानी नगर चौक दरम्यान भूमिगत गटार योजनेचे पाईप टाकण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पुंडलिकनगर येथे स्वामी समर्थ कमानीपर्यंत 600 मिलीमिटर व्यासाचे पाईप टाकले आहेत. पुढे त्या भागात 400 मिलीमिटर व्यासाची लाईन पुरेशी आहे. तरी पीएमसीशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

शहर अभियंता :पुंडलिकनगर भागातील लोकसंख्येच्या सर्वेक्षणानंतर पडताळणी करुन 600 मिलीमीटर व्यासाचे पाईप गरजेचे असेल तर तशी कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नितीन चित्ते :मागील बैठकीतील कार्यवाहीचे मुद्दे क्र.05 टिडीआर बाबत माहिती देण्यात यावी. नारेगांव, फाजलपुरा येथील टिडीआर बाबत माहिती देण्यात यावी.

मा.आयुक्त :टिडीआर बाबत तक्रार आलेली आहे. त्यानुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने विचारणा करण्यात आलेली आहे. खुलासा आल्यानंतर करण्यात येईल.

श्री.नितीन चित्ते :श्री.तुषार चौधरी यांनी स्वत: पत्र दिलेले आहे. 12 मिटर रस्त्याचा टिडीआर मागितलेला असतांना पालिकेच्या नगर रचना विभागाने 24 मिटर टिडीआर दिला आहे. फाजलपुरा येथील टिडीआर बाबतच्या भुखंडावर बँकेचे अर्ज आहे. त्या भुखंडाला टिडीआर दिला आहे. नारेगांव मध्ये ज्या जागेचा टिडीआर दिला आहे, त्या जागेचा नकाशा उपलब्ध आहे का?

सहा.संचालक न.रचना :संचिकेमध्ये नकाशा आहे.

श्री.नितीन चित्ते :फाजलपुराचा टिडीआर चा प्रश्न प्रलंबित का आहे? त्या अधिकाऱ्याचे नांव दडपले जाते. सात महिन्यापासुन पाठपुरावा केला जात आहे. यामध्ये समाधानकारक उत्तर न मिळाल्यास मा.न्यायालयात दाद मागावी लागेल.

श्री.नाईकवाडी.अ.रहिम :वॉर्ड-फ मध्ये एकाच मुलाचे जन्माचे दोन प्रमाणपत्र दिले गेले. संबंधीत नागरीक मनपामध्ये दुरुस्तीसाठी चकरा मारत आहे. वार्ड मधुन आरोग्य विभागात पाठविले आरोग्य विभागात पुण्याला पाठविले असे उत्तर दिले जाते.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : दोन प्रमाणपत्र दिले असल्यास निबंधकाकडे ते दोन प्रमाणपत्र सादर करावे. ते निर्णय घेतील.

मा.सभापती :एमओएच यांनी याबाबत तात्काळ नियमानुसार निर्णय घ्यावा.

श्रीमती शेख समिना :कुत्रे पकडण्याबाबत साप्ताहिक अहवाल आलेला आहे. माझ्या वार्डात कुत्रे पकडण्यासाठी अद्यापपर्यंत कुठलीच कार्यवाही केली नाही.

संचाकलक प्राणी संग्रहालय:कुत्रे पकडण्याची मोहिम शहरात सर्व ठिकाणी चालु केलेली आहे. तक्रार आल्यास वॉर्डात कुत्रे पकडण्याचे वाहन पाठविले जाते.

श्री.अ.नाईकवाडी रहिम :शहरात 50 ते 60 हजार कुत्रे आहेत. पिसाळलेले, जखमी कुत्रे यासाठी बॉडी नेमूण देण्यात यावी.

मा.सभापती :संबंधीत विभागाला कुत्रे पकडण्यासाठी आवश्यक वाहने दिलेली आहे.

श्री.नाईकवाडी अ.रहिम:डि.पी.रोड 1972 च्या प्लॅन बाबत माहिती द्यावी. सरळ रोड देण्यात यावा (बायजीपुरा येथे 1971 डि.पी. प्लॅन सभागृहात दोन नकाशे दाखवतात.)

मा.सभापती :नकाशा कोणता आहे?

सहाय्यक सं.नगर रचना:दोन कार्यालयाचे नकाशे आहे. सिटी सर्व्हे लॅण्ड रेकॉर्डने तयार केलेले नकाशे आहे. सध्या चंपा चौक ते जालना रोड हा रस्ता विकास आराखडयानुसार रुंद केल्या जाणार आहे.

श्रीमती शेख समिना :दहा मालमत्ता कधी काढण्यात येईल? बायजीपुरा एसएफएस अर्ध्या रस्त्यांसाठी केला तरी त्या रस्त्यासाठी केंव्हा करणार?

सहाय्यक सं.नगर रचना:अनाधिकृत असेल तर काढण्यात येईल.

श्रीमती शेख समिना :मागील बैठकीत श्री.बनकर,माजी कार्यकारी अभियंता (विद्युत) यांच्या संबंधी अहवाल मागविला होता. खुलासा करण्यात यावा.

आस्थापना अधिकारी-1 :स.सदस्य यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे विद्युत विभगाच्या चौकशी करणे संदर्भात दि.02.12.2015 रोजी पत्र दिलेले आहे. श्री.आर.एस.बनकर, श्री.शाकेर यांचे चौकशी संदर्भात तत्कालिन शहर अभियंता यांना अहवाल देण्या संदर्भात कळविण्यात आले होते. अहवाल अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

मा.सभापती :शहर अभियंता यांनी त्याबाबत खुलासा करावा.

शहर अभियंता :शहर अभियंता यांचेकडे सन-2012 मध्ये पत्र पाठविलेले आहे. तत्कालीन शहर अभियंता यांनी ही चौकशी करणे आवश्यक होते, आता याबाबत या प्रकरणी चौकशी करण्यासाठी सर्व कागदपत्रे द्यावी लागेल.

मा.सभापती :प्रकरणाची सर्व कागदपत्रे शहर अभियंता यांना चौकशी करीता देण्यात यावी.

श्री. विकास एडके :दि.24.08.2012 मध्ये पिया मार्केट बाबत चर्चा केली होती त्यावर कुठलाही निर्णय झाला नाही.

**विषय क्र. 33 :**

दिनांक 15/07/2015 (का.प.क्र.03), दि.23/07/2015 (का.प.क्र.03 दि.15/07/2015 ची तहकूब सभा), दि.28/07/2015 (का.प.क्र.04), दि.05/08/2015 (का.प.क्र.04 दि.28/07/2015 ची तहकूब सभा), दि.05/08/2015 (का.प.क्र.05), दि.07/08/2015 (का.प.क्र.06), दि.10/09/2015 (का.प.क्र.06 दि.07/08/2015 ची तहकूब सभा), दि.24/08/2015 (का.प.क्र.07), दि.28/09/2015 (का.प.क्र.08) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती :विषय क्रमांक-33 मंजुर.

**ठराव :**

दिनांक 15/07/2015 (का.प.क्र.03), दि.23/07/2015 (का.प.क्र.03 दि.15/07/2015 ची तहकूब सभा), दि.28/07/2015 (का.प.क्र.04), दि.05/08/2015 (का.प.क्र.04 दि.28/07/2015 ची तहकूब सभा), दि.05/08/2015 (का.प.क्र.05), दि.07/08/2015 (का.प.क्र.06), दि.10/09/2015 (का.प.क्र.06 दि.07/08/2015 ची तहकूब सभा), दि.24/08/2015 (का.प.क्र.07), दि.28/09/2015 (का.प.क्र.08) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 34 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दि.05/08/2015 रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीने पारीत केलेला ठराव क्र.05 अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2015/725. दि.13/08/2015 रोजीच्या आदेशान्वये दि.05/05/2015 ते दि.04/11/2015 पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-3 संवर्गात खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1. | गजानन आढाव | स्वच्छता निरीक्षक | आरोग्य विभाग | रु.430/- |
| 2. | संजय महादू नंदन | पशुधन पर्यवेक्षक | प्राणी संग्रहालय विभाग | रु.430/- |
| 3. | राहूल नटवरलाल पटेल | मिश्रक | आरोग्य विभाग | रु.430/- |
| 4. | दत्ता सरोदे | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.430/- |
| 5. | राजू सुरडकर | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.430/- |
| 6. | सय्यदा अफजलुन्नीसा नहेरी | कनिष्ठ लिपीक | विद्युत (इ/फ) विभाग | रु.430/- |
| 7. | शफीक अहेमद | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | रु.430/- |
| 8. | कृष्णा ठोकळ | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ब कार्यालय | रु.430/- |
| 9. | अरूण गुजलेकर | कनिष्ठ लिपीक | वार्ड-क कार्यालय | रु.430/- |
| 10. | प्रभु लक्ष्मण चव्हाण | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-क कार्यालय | रु.430/- |
| 11. | मो.मुसा मो.याकुब कुरैशी | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-क कार्यालय | रु.430/- |
| 12. | माधुरी शेंदूरकर | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ड कार्यालय | रु.430/- |
| 13. | अखिल उर रहेमान | कनिष्ठ लिपीक | वार्ड-इ कार्यालय | रु.430/- |
| 14. | विजय पाटील | कनिष्ठ लिपीक | वार्ड-फ कार्यालय | रु.430/- |
| 15. | विमल चोखाजी साठे | कनिष्ठ लिपीक | विद्युत(ब/क)विभाग | रु.430/- |
| 16. | राजेश पाटील | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता-ड कार्यालय | रु.430/- |
| 17. | राजेश पगारे | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता-ड कार्यालय | रु.430/- |
| 18. | विजय हिवराळे | कनिष्ठ लिपीक | शहर अभियंता विभाग | रु.430/- |
| 19. | इकबाल जावेद रज्जाक | कनिष्ठ लिपीक | संगणक विभाग | रु.430/- |
| 20. | आनंद खरात | कनिष्ठ लिपीक | लेखा विभाग | रु.430/- |
| 21. | मुक्तेश्वर लोखंडे | कनिष्ठ लिपीक | कार्यकारी अभियंता (अ/ड) विभाग | रु.430/- |
| 22. | भारती जगताप | कनिष्ठ लिपीक | जनसंपर्क विभाग | रु.430/- |
| 23. | विनोद साळवे | कनिष्ठ लिपीक | जलतरण विभाग | रु.430/- |
| 24. | मिलिंद विठ्ठल गायकवाड | कनिष्ठ लिपीक | रस्ते,इमारती,उद्यान (वॉर्ड-अ) | रु.430/- |
| 25. | अफसर सिद्दीकी | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.430/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26. | संगिता थोरात | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.430/- |
| 27. | सुभाष धांडे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.430/- |
| 28. | बी.के.गायकवाड | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.430/- |
| 29. | विनोद वासेकर | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.430/- |
| 30. | अलका नारायण बोरसे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.430/- |
| 31. | अशोक किसनराव जाधव | कनिष्ठ लिपीक | पाणी पुरवठा (ई/फ) विभाग | रु.430/- |
| 32. | रावसाहेब जावळे | कनिष्ठ लिपीक | प्राणी संग्रहालय | रु.430/- |
| 33. | शेख महेबूब हुसेन | कनिष्ठ लिपीक | आरोग्य विभाग | रु.430/- |
| 34. | अर्चना निकाळजे | संगणक ऑपरेटर | लेखा परीक्षण विभाग | रु.430/- |
| 35. | शेख रियाज शेख मुजीबोद्दीन | संगणक ऑपरेटर | संगणक विभाग | रु.430/- |
| 36. | जयश्री झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकुल कक्ष | रु.430/- |
| 37. | पद्माकर जाधव | डार्करूम सहा. | आरोग्य विभाग | रु.430/- |
| 38. | आरेफ खान मसुद खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 39. | भगीरथ जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 40. | हरिश्चंद्र सोनवणे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 41. | शेख फईम शेख बशीरोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 42. | मिलिंद घाटे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 43. | शेख रऊफ शेख माणिक | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 44. | महंमद याहया खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 45. | नजीर खान पठाण | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 46. | जगदीश गायकवाड | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 47. | प्रभु पवार | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 48. | रमेश सिरसाठ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 49. | महादेव मिसाळ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 50. | शेख निजाम शेख दगडू | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 51. | रंगनाथ बकले | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 52. | गुलाम रसुल खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 53. | रविंद्र पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 54. | अरूण बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 55. | सय्यद फरिदोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 56. | सतिश जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.430/- |
| 57. | शेख जावेद शेख अमजद | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-1 विभाग | रु.430/- |
| 58. | सर्वेश नांद्रेकर | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-1 विभाग | रु.430/- |
| 59. | मोहम्मद रफीयोद्दीन | चित्रपट चालक | पशुधन विकास विभाग | रु.430/- |
| 60. | रमेश शिंदे | प्लँट ऑपरेटर | पाणी पुरवठा-1 विभाग | रु.430/- |

उक्त कर्मचाऱ्यांपैकी अ.क्र.9 वरील श्री.अरुण गुजलेकर,कनिष्ठ लिपीक (दै.वे.) यांचा मुदतीवाढीचा अहवाल प्राप्त झालेला नसल्याने तुर्त त्यांचा विचार न करता,उर्वरित कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53(3) च्या परंतुकान्वये दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.07/11/2015 पासून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :विषय क्र.34 ला स्थगिती द्यावी. दै.वे.लिपिक श्री.अफसर सिद्दीकी, विरोधी पक्ष नेता दालन यांना पत्र टाईप करण्यास सांगण्यात आले असता त्यांनी काम करण्यास टाळाटाळ केली आहे. त्यामुळे या बैठकीपूर्वी स्थगिती देण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्य यांना योग्य वागणुक देण्यात यावी. या अटीवर मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :विषयाला स्थगिती देण्यात यावी. माझ्या सन्मानाची बाब आहे.

श्री.नितीन चित्ते :एखाद्या कर्मचाऱ्याबद्दल आक्षेप असल्यास लेखी मागणी करण्यात यावी. एका कर्मचाऱ्यामुळे इतर कर्मचारी यांना त्रास होईल. स.सदस्यांशी कर्मचारी यांनी सन्मानाने वागले पाहिजे. इतर कर्मचाऱ्यांचा विचार करण्यात यावा.

श्री.मोहन मोघावाले :एखाद्या कर्मचाऱ्याचे चुकत असल्यास त्यावर कारवाई करण्यात यावी.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :(सभागृहात कर्मचारी यांचे मुदतवाढ स्थगीत देण्याबाबत व सदरील कर्मचारी यांचे बाबत आक्षेप नोंदवतात.)

मा.सभापती : स.सदस्य यांना कर्मचाऱ्यांनी सन्मानाने वागणूक द्यावी, स.सदस्य श्री.नाईकवाडी यांनी दैनिक वेतन लिपीक संदर्भात आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. सदरील कर्मचारी यांना ताकीद देवून मुदतवाढीच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यांत येते. या विषयासह ऐनवेळचे सर्व विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या अ.क्र.01 ते 60 कर्मचाऱ्यांपैकी अ.क्र.9 वरील श्री.अरुण गुजलेकर,कनिष्ठ लिपीक (दै.वे.) यांचा मुदतीवाढीचा अहवाल प्राप्त झालेला नसल्याने तुर्त त्यांचा विचार न करता,उर्वरित वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (3) च्या परंतुकान्वये दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.07/11/2015 पासून पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरती नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 35 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.04 दिनांक 23/07/2015 नुसार महानगरपालिकेच्या दैनिक वेतनावरील एकूण 143 वर्ग-4 कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली होती. त्याआधारे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-2/1050/2015 दिनांक 31/07/2015 रोजीच्या आदेशान्वये दिनांक 03/05/2015 ते दिनांक 31/10/2015 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सद्यस्थितीत महानगरपालिका आस्थापनावरील वर्ग-4 संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती.मंदाबाई तुकाराम दांडगे | दै.वे. सेविका | महिला व बालकल्याण कक्ष | रु.340/- |
| 2 | दिपक शेषराव दाभाडे | दै.वे. सेवक | मा.उपआयुक्त (म) दालन | रु.340/- |
| 3 | रविंद्र प्रभाकर देवकर | दै.वे. वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 4 | स.शहाबुद्दीन स.जकरूद्दीन | दै.वे. वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 5 | रमेश सखाराम जाधव | दै.वे. वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 6 | रविंद्र विठ्ठल कांबळे | दै.वे. सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 7 | रमेश दत्तु देवडे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 8 | विनोद पांडूरंग तुपे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 9 | सुधाकर आसाराम त्रिंभुवन | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 10 | गोविंद कृष्णराव साळवे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | संजय विठ्ठल इंगळे | दै.वे. सेवक | कर आकरणी विभाग | रु.340/- |
| 12 | समिंदर रमेश | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 13 | प्रल्हाद गुंजाळे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 14 | कडूबा औताडे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 15 | मिलिंद दत्तोपंत आम्ले | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 16 | सिध्दार्थ पांडूरंग दांडगे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 17 | सतिश सोमाजी गडवे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 18 | सर्जेराव शिंदे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 19 | सुभाष निलकंठ | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 20 | रामेश्वर फुलारे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 21 | कमलबाई शिवन्ना गुडम | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 22 | कमलबाई भिमराव साळवे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 23 | रंजना तुळशीराम मोरे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 24 | लताबाई कारभारी घाटे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 25 | शहनाज बेगम रशिद खाँ | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 26 | इंदुबाई पांडूरंग दांडगे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 27 | इंदुबाई राजुरे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 28 | मंगलाबाई मिश्राम | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 29 | चंद्रकला शंकर आम्ले | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 30 | उषा सुनिल घोगरे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 31 | संध्या श्याम साळवे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 32 | सुनिता किसन साळवे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 33 | मलेका शाहीन शे.जलील अहेमद | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 34 | यशोधरा नामदेव वसाटे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 35 | विद्या मनोहर शेळवणे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 36 | छायाबाई अशोक म्हस्के | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 37 | शारदाबाई दलबहादुरसिंग ठाकुर | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 38 | राजेश प्रभाकर पवार | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 39 | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 40 | रावसाहेब जाधव | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 41 | कुदन काशिनाथ गणोरे | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 42 | मनोज लखनलाल तुळशीबागवाले | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 43 | रविंद्र खापे | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 44 | संदिप सुभाष घाग | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 45 | प्रल्हाद विठ्ठल करडे | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 46 | साहेबराव मुक्ताजी गायकवाड | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 47 | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 48 | अय्युब खाँ सांडू खाँ | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 49 | रमेश चंद्रय्या परके | दै.वे. वि. लाईनमन | विद्युत विभाग | रु. 430/- |
| 50 | अण्णासाहेब दाणे | दै.वे. वि. लाईनमन | उपअभियंता पा.पु | रु. 430/- |
| 51 | कैलास श्रीपत बनकर | दै.वे. वि. लाईनमन | विद्युत विभाग | रु. 430/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 52 | असलम खान मुकीद खान | दै.वे. मजुर | निवडणूक विभाग | रु.340/- |
| 53 | इलियास अ.बसरावी | दै.वे. मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु.340/- |
| 54 | मो.युसुफ़ मो.उस्मान | दै.वे. मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु.340/- |
| 55 | शेख इम्रान शेख फ़जलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 56 | म.गयासोद्दीन सलामोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 57 | विमलबाई भुईगड | सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 58 | राजेंद्र दिनकर कुंभारीकर | प्रयोग शाळा सहाय्यक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 59 | सौ.जयश्री वसंत जोशी | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 60 | विलास दत्तू नाईक | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 61 | सुरेश दामोधर नलावडे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 62 | श्रीमती.जिजाबाई नवगिरे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 63 | श्रीमती.पार्वता दाडेकर | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 64 | भरत पचलोरे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 65 | सुभाष दत्तात्रय सुरासे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 66 | मुंढे भानुदास नरसू | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 67 | कमल कचरु मोरे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 68 | भोसले पंढरीनाथ देवीदास | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 69 | नारायण शेषराव जंगले | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 70 | वाचा सुंदर संतोष | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 71 | निकम शांताराम नारायण | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 72 | तनवीर खान नियाजी | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 340/- |
| 73 | शेख हबीब लाल | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 74 | मनिषा किसनराव पाटील | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 75 | फ़िरोज खान गणी खान | दै.वे. वॉर्डबॉय | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 76 | मोहमंद सज्जाद सईद अन्सारी | दै.वे. वॉर्डबॉय | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 77 | परवेश अण्णाजी मिसाळ | दै.वे. वॉचमन | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 78 | युवराज लांडगे | दै.वे. सेवक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 79 | जाधव सखुबाई शंकर | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 80 | गायकवाड मिना गणपत | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 81 | वाघ सखुबाई आसाराम | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 82 | काळे मिनाबाई काशिनाथ | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 83 | फुले धुरपताबाई सांडू | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 84 | फ़िरंगी लिला नरसिंग | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 85 | कांबळे शोभा साहेबराव | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 86 | के.डब्ल्यु.पोपलवार | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 87 | विजय गोविंद साबळे | प्रयोग शाळा सहाय्यक | आरोग्य विभाग | रु.430/- |
| 88 | दिलीप श्रीधर ठोंबरे | दै.वे.मजुर | अग्निशमन विभाग | रु.340/- |
| 89 | बाबासाहेब रंजाजी कांबळे | दै.वे. हमाल | वॉर्ड-ब कार्यालय | रु.340/- |
| 90 | राजेश दिपचंद लाहोट | दै.वे. स्विपर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 91 | किशोर विनायक साबळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 92 | नदिम अख्तर | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 93 | विष्णू नारायण काळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 94 | मिर्झा अन्वर बेग | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 95 | फेरोज अहमद मुस्ताफ अ खान | दै.वे.वॉचमन | वार्ड क कार्यालय | रू.340/- |
| 96 | गणेश साहेबराव उजगरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 97 | अनिल येडूबा साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 98 | लताबाई अशोक साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 99 | संजय शामराव ठोबरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 100 | मोहमंद मुदस्सीर शेख बशीर | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 101 | शेख जावेद शे.जाफर | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 102 | श्रीमती.रमादेवी भगवान म्हस्के | दै.वे. सेविका | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 103 | राजु चंद्रभान बढे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 104 | द्वारकाबाई नाना अडागळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-डकार्यालय | रु.340/- |
| 105 | चतुराबाई भिमराव हतागळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 106 | रविंद्र शामसुंदर कांबळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 107 | संजय रतन खरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 108 | किशोर खुशाल रामटेके | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 109 | अतुल हरीचंद्र  फुलके | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 110 | शोभाबाई दिलीप साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 111 | जाईबाई साहेबराव साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 112 | हौसाबाई रामभाऊ वडमोर | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 113 | मिनाबाई दामोधर सोनवणे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 114 | पुष्पाबाई जानकु त्रिभुवन | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 115 | सावित्रीबाई भगवान मगरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 116 | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 117 | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारत माता मंदिर (सांस्कृतीक विभाग) | रु.340/- |
| 118 | सुनिल किसनराव दाभाडे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 119 | सतिश केशव बनकर | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 120 | राजेंद्र भागाजी नवगिरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 121 | मिलींद धनाजी गायकवाड | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 122 | बालसिंग भोपाल कणसे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 123 | रामदास हरिचंद्र बमणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 124 | किशोर मोतीराम उगळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 125 | राजेश नाथाजी गवळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 126 | रावसाहेब हरीभाऊ मगरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 127 | बाळकृष्ण कचरु भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 128 | सुरेश नामदेव खरात | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 129 | कैलास पांडुरंग वाणी | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 130 | संतोष गोविंद जगे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 131 | वैजिनाथ देवराव साबळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 132 | सुनिल दौलत अंभोरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 133 | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 134 | छगन तुळजाराम सलामपूरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 135 | सुभाष बाबुलाल हरणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 136 | बबन पंडीतराव जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 137 | राधाकिसन फकीरचंद बकले | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 138 | वाजीद खान मन्सूर खान | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 139 | इम्रान उल्ल खान फ़ैज उल्ला | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 140 | फ़ारुख अली तुराब अली | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 141 | एहतेशाम अली हाश्मी | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 142 | मिर्झा रुफ़द बेग | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 143 | सुरेश धाबर्डे | दै.वे.सेवक | नगर सचिव विभाग (मा.सभापती, स्था.स.) | रु.340/- |

उपरोक्त प्रमाणे एकुण 143 दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (3) च्या परंतुकान्वये दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 03/11/2015 ते दिनांक 30/04/2016 पर्यंत 06 (सहा) महिन्यांसाठी तात्पुरती नियुक्ती देणेस्तव तसेच सौ.निरु कृष्णा गवल, दैनिक वेतन,सेविका, आरोग्य विभाग यांना आरोग्य विभागाच्या अहवालानुसार कामावरुन कमी करण्यात आले होते. परंतु संबंधितांनी मा.सभापती,स्थायी समिती यांचेकडे विनंती अर्ज केला. मा.स्थायी समितीचा ठराव क्र. 4 दिनांक 23/07/2015 अन्वये सौ.निरु कृष्णा गवल,दै.वे.सेविका यांना रु.500/- द्रव्यदंड व रु.100/- च्या मुद्रांकावर यापुढे अशी चुक होणार नाही असा माफीनामा लिहुन घेण्यात यावा पुढील मुदतवाढ देण्यात यावी,अशी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-2/ 1737/2015 दिनांक 02/12/2015 च्या आदेशान्वये सौ.निरु कृष्णा गवल यांना कामावर रुजु करुन घेण्यात आले असुन त्या दिनांक 03/12/2015 रोजी आरोग्य विभागात रुजु झाल्या आहेत. सौ.गवल यांना दि.03/12/2015 ते 30/04/2016 पर्यंत प्रतिदिन रु.340/- या दराने तात्पुरती नियुक्ती देण्याबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-4 संवर्गातील अ.क्र.01 ते 143 कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 03/11/2015 ते दिनांक 30/04/2016 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यास तसेच सौ.निरु कृष्णा गवल, दैनिक वेतन, सेविका, आरोग्य विभाग यांना आरोग्य विभागाच्या अहवालानुसार कामावरुन कमी करण्यात आले होते, मा.स्थायी समितीचा ठराव क्र.4 दिनांक 23/07/2015 अन्वये सौ.निरु कृष्णा गवल,दै.वे.सेविका यांना रु.500/- द्रव्यदंड व रु.100/- च्या मुद्रांकावर यापुढे अशी चुक होणार नाही असा माफीनामा लिहुन घेण्यात यावा पुढील मुदतवाढ देण्यात यावी,अशी मंजुरी देण्यात आलेली आहे, त्याप्रमाणे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-2/ 1737/2015 दिनांक 02/12/2015 च्या आदेशान्वये सौ.निरु कृष्णा गवल यांना कामावर रुजु करुन घेण्यात आले असुन त्या दिनांक 03/12/2015 रोजी आरोग्य विभागात रुजु झाल्या असल्यामुळे, सौ.गवल यांना दि.03/12/2015 ते 30/04/2016 पर्यंत प्रतिदिन रु.340/- या दराने तात्पुरती नियुक्ती देण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 36 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, श्री.उत्तम बाळासाहेब घायतिलक,शिपाई, कर आकारणी विभाग हे सेवेत कार्यरत असतांना त्यांना स्वतःच्या Oesophagus Squamus Cell Carcinoma gr. II (कर्करोग) साठी अग्रिम रू.1,50,000/- (अक्षरी रू.एक लाख पन्नास हजार मात्र) घेतलेले आहे.

त्यानुषंगाने सदर अग्रिमाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी सादर केलेल्या वैद्यकीय देयक रक्कम रू.2,44,699/- पैकी नियमानुसार अनुज्ञेय रक्कम रू.2,07,498/- च्या 90% रक्कम रू.1,86,748/- (अक्षरी रू.एक लाख श्याएंशी हजार सातशे अठ्ठेचाळीस मात्र) त्यापैकी एकूण दाखल केलेल्या देयकाच्या 5% रक्कम रू.12,235/- (अक्षरी रू.बारा हजार दोनशे पस्तीस मात्र) मनपा फंडात जमा करून, त्यांना उर्वरीत रक्कम रू.1,74,513/- (अक्षरी रू.एक लाख चौऱ्यात्तर हजार पाचशे तेरा मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चामधुन अग्रिम रक्कम रू.1,50,000/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.24,513/- (अक्षरी रू.चोवीस हजार पाचशे तेरा मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देवून रक्कम अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.उत्तम बाळासाहेब घायतिलक,शिपाई, कर आकारणी विभाग हे सेवेत कार्यरत असतांना त्यांनी स्वतःच्या Oesophagus Squamus Cell Carcinoma gr. II (कर्करोग) या आजारावर सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या देयक र.रू.2,44,699/-पैकी नियमानुसार अनुज्ञेय र.रू.2,07,498/- च्या 90% र.रू.1,86,748/- (अक्षरी रू.एक लाख श्याएंशी हजार सातशे अठ्ठेचाळीस मात्र) त्यापैकी एकूण दाखल केलेल्या देयकाच्या 5% र.रू.12,235/- (अक्षरी रू.बारा हजार दोनशे पस्तीस मात्र) मनपा फंडात जमा करून, त्यांना उर्वरीत र.रू.1,74,513/- (अक्षरी रू.एक लाख चौऱ्यात्तर हजार पाचशे तेरा मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चामधुन अग्रिम र.रू.1,50,000/- वजा जाता उर्वरीत र.रू.24,513/-(अक्षरी रू.चोवीस हजार पाचशे तेरा मात्र) संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 37 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.दादाराव रखमाजी लाहोटी, वरिष्ठ लिपीक, आस्थापना-1 विभाग यांनी स्वतःच्या ह्दयाच्या आजारपणावर (Unstable Angina with Coronary Artery Disease with Single Vessel Disease) उपचारासाठी अग्रीम रु.1,50,000/- (अक्षरी रु.एक लाख पन्नास हजार मात्र) मंजूर करुन अदा करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने सदर अग्रीमाचे समायोजन करण्यासाठी संबंधितांनी सादर केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रु.2,21,023/- च्या 90% रक्कम रु.1,98,921/- (अक्षरी रु.एक लाख अठ्ठयाण्णव नऊशे एकवीस मात्र) पैकी 5% रक्कम रु.11,757/- (अक्षरी रु.अकरा हजार सातशे सत्तावन्न मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रु.2,35,135/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरीत रक्कम रु.1,87,164/- (अक्षरी रु.एक लाख सत्त्याऐंशी हजार एकशे चौसष्ठ मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

करिता श्री.डी.आर.लाहोटी,वरिष्ठ लिपीक यांना मंजूर करण्यात आलेले रु.1,87,164/- मधून अग्रीम रक्कम रु.1,50,000/- वजा जाता,सदर रकमेचे समायोजन करुन उर्वरीत फरकाची रक्कम रु.37,164/- (अक्षरी रु.सदोत्तीस हजार एकशे चौसष्ठ मात्र) अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.दादाराव रखमाजी लाहोटी, वरिष्ठ लिपीक, आस्थापना-1 विभाग यांनी स्वतःच्या ह्दयाच्या (Unstable Angina with Coronary Artery Disease with Single Vessel Disease) आजारावर संबंधितांनी सादर केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रु.2,21,023/- च्या 90% रक्कम रु.1,98,921/- (अक्षरी रु.एक लाख अठ्ठयाण्णव नऊशे एकवीस मात्र) पैकी 5% रक्कम रु.11,757/- (अक्षरी रु.अकरा हजार सातशे सत्तावन्न मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रु.2,35,135/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरीत रक्कम रु.1,87,164/- (अक्षरी रु.एक लाख सत्त्याऐंशी हजार एकशे चौसष्ठ मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मंजुरी देण्यांत येते. तसेच

श्री.डी.आर.लाहोटी,वरिष्ठ लिपीक यांना मंजूर करण्यात आलेले रु.1,87,164/- मधून अग्रीम रक्कम रु.1,50,000/- वजा जाता,सदर रकमेचे समायोजन करुन उर्वरीत फरकाची रक्कम रु.37,164/- (अक्षरी रु.सदोत्तीस हजार एकशे चौसष्ठ मात्र) संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 38 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की,सन 1974 ते 1979 या कालावधीत नगर परिषद प्रशासनातर्फे व सन 1982 नंतर महानगरपालिका प्रशासनातर्फे औरंगाबाद शहरातील नाल्यावरील जागा तसेच नाल्या व्यतिरिक्त अतिशय मोक्याच्या जागा 30 ते 90 वर्षाच्या कालावधीसाठी रु.50/- ते रु.100/- प्रति वर्ष या नाममात्र दराने दीर्घमुदतीच्या भाडेपट्टयावर देण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून सदर भाडेपट्टयाचा कायदेशीर अभ्यास करुन फेररचना करणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित संचिकांची फेर तपासणी करणे, करारनाम्यातील अटी व शर्ती तपासणे, फेर करारनामा करणे, मा.सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या ठरावांची पडताळणी करुन त्याबाबत कालबाह्य झालेल्या अटी व शर्तीचे फेररचना करणे, भाडेपट्टयावर दिलेल्या कोट्यावधी रुपये किंमतीच्या जागा ज्यांचा कालावधी संपुष्टात आलेल्या आहेत,अशा जागा कायदेशीर बाबी तपासणी करुन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे इत्यादी कामे करणेबाबत कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे.

उक्त बाबींच्या अनुषंगाने संचिका तपासणीचे काम नि:शुल्क करण्यास श्री.मो.रा.थत्ते,मुख्य लेखा परीक्षक (सेवानिवृत्त),महानगरपालिका औरंगाबाद यांनी सहमती दर्शविलेली आहे. तसेच त्यांची स्थानिक संस्था कर विभागामध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये आसन व्यवस्था, संगणक,संगणक ऑपरेटर व त्यांना घरुन ने-आणेसाठी वाहन उपलब्ध करुन दिसल्यास सदरील कामे तातडीने मार्गी लागतील व महानगरपालिकेच्या मोक्याच्या ठिकाणी अल्प भाड्यावरील जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करणेसाठी मदत होईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील नाल्यावरील जागा तसेच नाल्या व्यतिरिक्त अतिशय मोक्याच्या जागा 30 ते 90 वर्षाच्या कालावधीसाठी रु.50/- ते रु.100/- प्रति वर्ष या नाममात्र दराने दीर्घमुदतीच्या भाडेपट्टयावर देण्यात आलेले असल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून सदर भाडेपट्टयाचा कायदेशीर अभ्यास करुन फेररचना करणे संबंधित संचिकांची फेर तपासणी करणे, करारनाम्यातील अटी व शर्ती तपासणे, फेर करारनामा करणे, मा.सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या ठरावांची पडताळणी करुन त्याबाबत कालबाह्य झालेल्या अटी व शर्तीचे फेररचना करणे, भाडेपट्टयावर दिलेल्या कोट्यावधी रुपये किंमतीच्या जागा ज्यांचा कालावधी संपुष्टात आलेल्या आहेत,अशा जागा कायदेशीर बाबी तपासणी करुन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे इत्यादी कामे करणेबाबत कार्यवाही सुरु करणे आवश्यक असल्यामुळे, उक्त बाबींच्या अनुषंगाने संचिका तपासणीचे काम नि:शुल्क करण्यास श्री.मो.रा.थत्ते,मुख्य लेखा परीक्षक (सेवानिवृत्त),महानगरपालिका औरंगाबाद यांनी सहमती दर्शविल्यामुळे तसेच त्यांची स्थानिक संस्था कर विभागामध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये आसन व्यवस्था, संगणक, संगणक ऑपरेटर व त्यांना घरुन ने-आणेसाठी वाहन उपलब्ध करुन देण्यास व सदरील कामे तातडीने मार्गी लावणे व महानगरपालिकेच्या मोक्याच्या ठिकाणी अल्प भाड्यावरील जागा ताब्यात घेणेसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्रीमती शेख समिना :वार्ड क्र.57 मध्ये कचरा गोळा करण्यासाठी कर्मचारी येत नाही. कचऱ्यामुळे वॉर्डात आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

घनकचरा व्यवस्थापक :स्वत:वार्डामध्ये भेट देवुन पाहणी करण्यात येईल. तसेच ताबडतोब कचऱ्याची समस्या सोडविण्यात येईल.

श्री.नाईकवाडी अ.रहीम :सिडको हडकोतील बचतगटांना काम दिलेले आहे. त्याची माहिती देण्यात यावी. बचतगटांना Continue करु शकतो का? याबाबत विचारणा केली होती. माहिती मिळालेली नाही.

मा.सभापती : माहिती देण्यात यावी.

घनकचरा व्यवस्थापक :जे कर्मचारी काम करीत नाही. त्यांचेवर कारवाई करण्यात येईल. 32 कर्मचारी काम करीत नाही ते सतत गैरहजर आहेत त्यांचेवर कारवाई करण्यात येईल. सिडको हडको येथील बचतगटांना 2006 मध्ये काम दिलेले आहे.

श्री.नितीन चित्ते :विना टेंडर काम दिलेले आहे. बचत गटाचेच कर्मचारी काम करतात का? हे महत्त्वाचे आहे. बचतगटांना कर्मचाऱ्यांचे साहित्य पुरवठा करणे संदर्भात करार झालेला आहे. परंतु भांडार विभागातुन त्यांना साहित्य पुरविले जाते.

मा.सभापती :बचतगटांकडुन पूर्ण तास काम करुन घेण्यात यावे. त्याची माहिती देण्यात यावी.

श्री.नाईकवाडी अ.रहीम :समता नगर रोड बाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे):टेंडर झालेले आहे. A.S.Constructions ला काम दिलेले आहे.

मा.सभापती :पेमेंटची समस्या आहे. नियमानुसार काम करण्यात यावे. शहर सुधारण्याचे काम सर्वांना करावे लागणार आहे.

श्री.नितीन चित्ते :शहरातील रुग्णालये, औषध विक्रीचे दुकाने यातुन निघणाऱ्या बायोमेडीकल वेस्टची विल्हेवाट लावण्यासाठी नाशीक येथील वॉटर ग्रेस कंपनी सोबत 20 वर्षाच्या करार सन 2002-03 मध्ये केलेला आहे. जैविक कचऱ्याबाबत मागील बैठकीत चर्चा केलेली आहे. वॉटर ग्रेस कंपनीच्या कराराबाबत माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:वॉटर ग्रेस कंपनी बाबत चर्चा झालेली आहे. सन-2007 पासुन शुल्क वसुली कंपनीकडेच सोपविण्यात आले तेंव्हा पासुन कंपनी शुल्क वसुल करते. मनपा पदाधिकारी यांनी प्लांटला भेट दिली तेंव्हा अनियमितता आढळुन आली आहे. कंपनीला नोटीस बजावण्यात आली आहे.

मा.सभापती :मुळ करारनाम्यानुसार काम करण्यात यावे. मुळ करारनाम्याप्रमाणे रुग्णालयांकडुन महापालिकेनेच शुल्क वसुल करावे.

श्री.नितीन चित्ते :संबंधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :या संबंधीत चौकशी समिती नेमण्यात आली होती. दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद